




# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25



विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २२७ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार १८ /०९/२०२६ । पाने - ६



सिल्क फेस्टिवल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी

१९५९ पासून
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.


# रस्त्यावर भाजी विक्री करणाऱ्यांवर पालिकेचा दणका

## पर्यायी जागा देऊनही रस्त्यावरच व्यवसाय, अखेर भाजीपाला जप्त



### पालिकेने दिली पर्यायी जागा; कारवाईने नागरीक समाधानी

रस्त्यावरील अतिक्रमणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी नगरपालिकेने भाजी विक्रेत्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मालदाड रोड तसेच मेडीकव्हर हॉस्पिटलसमोरील परिसरात अधिकृत भाजी मंडईसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मालदाड रोडवरील अनेक विक्रेत्यांनी पालिकेने दिलेल्या जागेत व्यवसाय सुरू केला. मात्र, अकोले बायपास रोडवरील काही विक्रेते उपलब्ध करून दिलेली जागा पसंत नसल्याचे सांगत पुन्हा पेटिट विद्यालय परिसरासह रस्त्याच्या कडेला व्यवसायासाठी बसत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि अपघाताचा संभाव्य धोका लक्षात घेऊन संगमनेर नगरपालिका प्रशासनाने रस्त्यावर भाजीविक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात अखेर धडक कारवाई सुरू केली आहे. पालिकेने पर्यायी जागा उपलब्ध करून देऊनही रस्त्याच्या कडेला पुन्हा दुकाने थाटणाऱ्या विक्रेत्यांवर गुरुवारी (दि. १७) अतिक्रमण विभागाने कारवाई करत रस्त्यावर मांडलेला भाजीपाला जप्त केला. अचानक झालेल्या या कारवाईमुळे भाजी विक्रेत्यांमध्ये काही काळ खळबळ उडाली. शहरातील मालदाड रोड, अकोले बायपास तसेच इतर प्रमुख वर्दळीच्या रस्त्यांवर काही भाजी विक्रेते हातगाड्या, टोपल्या आणि अन्य साहित्य रस्त्याच्या कडेला लावून व्यवसाय करीत होते. त्यामुळे वाहनचालकांना मार्ग काढताना अडचणी येत असून, अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत होती. पादचाऱ्यांनाही रस्त्यावरून जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत होते.

रस्त्यावर व्यवसाय करू नये आणि पालिकेने उपलब्ध करून दिलेल्या जागेतच व्यवसाय करावा, अशा वारंवार सूचना संबंधित विक्रेत्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र, या सूचनांकडे दुर्लक्ष करून पुन्हा रस्त्यावर भाजीपाला मांडण्यात आल्याने अतिक्रमण विभागाने गुरुवारी प्रत्यक्ष कारवाई केली. पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर मांडलेला भाजीपाला ताब्यात घेतला. पालिकेच्या वाहनांमध्ये भाजीपाला भरून तो जप्त करण्यात आला. कारवाईची माहिती मिळताच काही विक्रेत्यांनी घटनास्थळी गर्दी केली. मात्र, पालिका प्रशासनाने वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणावर कारवाई सुरूच ठेवली. शहरातील रस्ते नागरिकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी मोकळे राहावेत, पादचाऱ्यांना अडथळ्याविना ये-जा करता यावी आणि वाढत्या अतिक्रमणाला आळा बसावा या उद्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचे नगरपालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. पालिकेने विक्रेत्यांसाठी पर्यायी जागेची व्यवस्था केली असून, व्यवस्था उपलब्ध असताना रस्त्यावर व्यवसाय करण्यास परवानगी दिली जाणार नाही, अशी भूमिका प्रशासनाने घेतली आहे. यापुढेही रस्त्यावर अतिक्रमण करून व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही पालिका प्रशासनाने दिला आहे.

# जरांगेंचे उपोषण स्थगित

## सरकारला तीन महिन्यांचा अल्टिमेटम!

बीड (वृत्तसंस्था)

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने निघालेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी पहाटे आपले उपोषण सोडले. मागील २० दिवसांपासून हे उपोषण सुरू होते. सरकारच्या शिष्टमंडळाने बीडमधील पाटोदा येथे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत त्यांची मनधरणी केली. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री दादा भुसे, आमदार सुरेश धस, आमदार प्रसाद लाड आणि बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधला. यानंतर सकाळी ६ वाजता पत्रकार परिषद घेऊन उपोषण सोडल्याची घोषणा करण्यात आली.



सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी सरकारला तीन महिन्यांचा वेळ दिला. या काळात मागण्या पूर्ण न केल्यास आम्ही मुंबई गाठणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. उपोषण आज स्थगित करत असलो तरी आंदोलन सुरूच राहणार असेही मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मनोज जरांगे पाटील पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आपल्या समर्थकांना आवाहन करताना म्हणाले, तीन वर्षांपासून आपण आरक्षणासाठी लढत आहोत. आता सरकारला आणखी तीन महिने देऊ. तीन वर्ष तीन महिने आपण लढत आहोत असे समजू. सरकारवर आपण विश्वास ठेवत असलो तरी हे आंदोलन सुरूच राहणार आहे. ९० दिवस थांबलो तरी काहीही फरक पडणार नाही. आपण ही शेवटची फसवणूक समजू. सरकारला हे तीन महिने शेवटचे देऊ. मनोज जरांगे पाटील मुंबईत आंदोलन करण्यासाठी निघालेले असताना पाटोदा येथे त्यांची प्रकृती खालावली होती. (पान२)

# संगमनेरच्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्या

## आमदार अमोल खताळ यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी०

संगमनेर- संगमनेर तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात अनियमित पाऊस आणि पावसात पडलेल्या दीर्घ खंडामुळे खरीप पिकांची अवस्था चिंताजनक झाली आहे. अनेक ठिकाणी पिके जळून जाण्याच्या मार्गावर असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांना शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यात शेतकऱ्यांनी खरीप हंगामात मका, सोयाबीन, बाजरी यांसह विविध कडधान्यांच्या पिकांची मोठ्या प्रमाणावर पेरणी केली आहे. पेरणीनंतर सुरुवातीच्या काळात झालेल्या पावसामुळे पिकांची उगवण चांगली झाली होती. मात्र, त्यानंतर पावसाने मोठा खंड दिल्याने पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला आहे. सध्या पिकांना पाण्याची नितांत गरज असताना पुरेसा पाऊस न झाल्याने अनेक भागांतील पिके कोमेजली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे.

या परिस्थितीची आमदार खताळ यांनी गांभीर्याने दखल घेत मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. पिकांची सद्यस्थिती, पावसाचा झालेला परिणाम आणि संभाव्य उत्पादनातील घट याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल तयार करण्यासाठी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच संबंधित विभागाला तातडीने प्रत्यक्ष पीक पाहणी करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.प्रत्यक्ष शेतावर जाऊन पंचनामे व पीक पाहणी केल्यास पावसाच्या खंडामुळे झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ चित्र शासनासमोर येईल. त्यानुसार शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेणे शक्य होईल, असेही आमदार खताळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिले.

पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च आधीच वाढला आहे. त्यातच खरीप हंगामातील पिके हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे शासनाने परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी. तसेच आवश्यक त्या सवलती आणि शासनाच्या नुकसानभरपाईच्या योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी केली आहे.

संगमनेर कृषी विभागाच्या चार कृषी मंडलांत एकूण ८३ हजार ७४१ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. त्यापैकी ३३ हजार ७९२.५ हेक्टर म्हणजेच ४०.३५ टक्के क्षेत्र बाधित झाले असल्याची माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. (पान २ वर)

# घारगावात व्यापाऱ्याची ७० हजारांची रोकड लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी) घारगाव - दुकान बंद करून मुलीला घेण्यासाठी घारगाव (ता. संगमनेर) बसस्थानक परिसरात आलेल्या व्यापाऱ्याची गाडी लॉक नसल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने गाडीत ठेवलेली ७० हजार रुपयांची रोकड असलेली पैशांची बॅग लंपास केली. बुधवारी (दि.१६) रात्री साडेसात ते पावणेआठ वाजेच्या दरम्यान ही घटना घडली.

रोहिदास भाऊराव खोंड (वय ७१, रा. घारगाव) यांचे स्टेट बँकेशेजारी भुसार मालाचे दुकान आहे. बुधवारी सायंकाळी ७.१५ वाजता दुकान बंद करून ते घरी जाण्यासाठी निघाले. त्यांनी दुकानाच्या चाव्या आणि पैशांची बॅग कारच्या गिअरजवळ ठेवली. संगमनेरहून बसने येणाऱ्या मुलीला घेण्यासाठी त्यांनी गाडी उभी केली. गाडीचा दरवाजा बंद केला; मात्र लॉक करण्याचे राहून गेले. त्यानंतर ते केस कर्तनालयात गेले. तेथून बाहेर आल्यानंतर मुलगी बसने आली आहे का, हे पाहण्यासाठी बसकडे गेले. मुलगी आलेली नसल्याने ते पुन्हा गाडीकडे परतले. रात्री ७.४५ वाजता गाडी उघडून पाहिली असता पैशांची बॅग गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. बॅगमध्ये पाचशे, शंभर, पन्नास रुपयांच्या नोटांसह अन्य नोटा व चिल्लर मिळून ७० हजार रुपयांची रोकड होती. अवघ्या पंधरा मिनिटांच्या कालावधीत गाडीतील रोकड लंपास झाल्याने परिसरात खळबळ उडाली. याप्रकरणी खोंड यांनी घारगाव पोलिसांत अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दिली आहे.









Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
• अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
• माफक दरात - संगमनेर येथेच
• 105 बेड्स
• तज्ञ डॉक्टर्स
• अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालिसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# पुरोगामी महाराष्ट्रात भोंदूगिरीचे भयावह वास्तव अंनिसमुळे समोर

## सहा महिन्यात राज्यात १०० हून अधिक भोंदू बाबांविरोधात गुन्हे दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक- राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणाला आज (गुरुवारी)बरोबर सहा महिने पूर्ण होत आहे.पुरोगामी महाराष्ट्रात भोंदूगिरीचे भयावह वास्तव अंनिसमुळे समोर आले आहे. या सहा महिन्यात पोलिसांनी राज्यात शंभरहून अधिक भोंदू बाबांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. यात बहुतांशी प्रकरणात महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे समोर आले आहे.पुरोगामी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणातभोंदूंचे पेव फुटले बाबत राज्यभर चर्चा सुरू आहे. महाराष्ट्राला चिंतेत टाकणारी व विचार करायला लावणारी ही गंभीर बाब आहे.



भोंदू खरात प्रकरणानंतर महा. अंनिसने राज्यभर बुवाबाजी संघर्ष परिषदांचे आयोजन केले होते. त्यामुळे शोषक भोंदूगिरी विरोधात चर्चा होऊन पीडितांना पाठबळ मिळाले. काही ठिकाणी उत्स्फूर्त तर काही ठिकाणी अंनिसच्या प्रयत्नाने हे गुन्हे दाखल झाले आहेत, अशी माहिती महा. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, अड रंजना पगार -गवांदे, कृष्णा चांदगुडे व विष्णुदास लोणारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

या यादीवरून असे लक्षात येते की बहुतांश सर्वच धर्मातील भोंदू बाबा विरोधात गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम केवळ हिंदू धर्मातच केले जाते , या सनातनी आरोपाला पुन्हा एकदा सणसणीत उत्तर मिळाले आहे. भोंदू बाबांनी ग्रामीण भागासह व शहरी भागातील महिला व पुरुष यांची फसवणूक केल्याचे या घटनांवरून उघड झाले आहे. विशेषत: यात महिलांवरील शाररिक शोषणासह आर्थिक लुटीचे प्रमाण अधिक आहे . करणी भानामती काढतो, अंगात आलेले भूत उतरवतो, अघोरी पूजा करतो, कौटुंबिक समस्या, आर्थिक अडचणी, आजारपण यातून बाहेर काढतो, पैशांचा पाऊस पाडतो इत्यादी कारणांसाठी भोंदूने भक्तांची फसवणूक केली आहे.

भितीपोटी व सामाजिक प्रतिष्ठेपोटी अनेक पीडित समोर येण्यास घाबरत होते. खरात प्रकरणानंतर पीडित महिलांना लढण्याची हिंमत निर्माण झाली आहे,त्यांना न्यायाची अपेक्षा निर्माण झाली आहे. त्यामुळे महा. अंनिस च्या मदतीने एवढे गुन्हे दाखल झाले आहेत. इतरही आणखी पीडितांनी पुढे येण्याची गरज निर्माण झाली आहे.

अंधश्रद्धेमुळे समाजातील फसवणूक रोखण्यासाठी शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने १८ वर्ष लढा दिला. या संघर्षा नंतर २०१३ मध्ये 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा व त्याचे समूळ उच्चाटन अधिनियम २०१३' हा कायदा अस्तित्वात आला. असा कायदा बनविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले होते. या कायद्याची प्रभावी अंबलबजवणी करण्यात सरकार अयशस्वी ठरले असले तरी अंनिस मर्यादा व क्षमता याचा विचार करता, आपल्या पातळीवर त्याचे प्रबोधन, प्रचार, प्रसार करत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी गुन्हे दाखल होत आहेत . परंतु या कायद्याचे नियम अजून बनविले गेले नसल्याने गुन्हा नोंद करताना संभ्रम तयार होत आहे. त्यामुळे कायद्याचे नियम लवकर बनवावे व प्रत्येक पोलीस स्टेशनला या कायद्याच्या अंमलबजावणी कामी दक्षता अधिकाऱ्याची नेमणूक व्हावी असे आवाहन महा. अंनिसने केले आहे.

हे गुन्हे जादूटोणा विरोधी कायदा व इतर कायद्याच्या कलमाखाली दाखल झालेले आहेत.

# शेतकी सहकारी संघाने काळानुरूप बदल स्वीकारावेत - माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर (प्रतिनिधी) : संगमनेर शेतकी सहकारी संघाच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची ६७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. यावेळी राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सभासदांशी संवाद साधताना शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या या संस्थेची वाटचाल अधिक सक्षम करण्यासाठी काळानुरूप बदल स्वीकारत धाडसी, दूरदृष्टीचे आणि शेतकरीहिताचे निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली.



पुढे बोलताना श्री. थोरात म्हणाले की शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी तसेच त्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून अनेक संस्था उभ्या राहिल्या. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीतून बाजार समित्यांची संकल्पना पुढे आली. याच काळात तीर्थरूप भाऊसाहेब थोरात (दादा) यांनी १९५९ साली संगमनेर शेतकी सहकारी संघाची स्थापना केली.

गेल्या ६७ वर्षांच्या वाटचालीत नियोजनबद्ध कारभार, काटकसर आणि पारदर्शकतेच्या माध्यमातून शेतकी सहकारी संघाने शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. संस्थेच्या उभारणीपासून आजपर्यंतच्या जडणघडणीत अनेक आजी-माजी चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक, सभासद तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

एक-एक रुपयाची काळजी घेणे, काळानुरूप बदल स्वीकारणे आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक निर्णय घेणे, हे संस्थेचे वैशिष्ट्य राहिले आहे. सध्या संस्थेचे दोन पेट्रोल पंपही कार्यरत असून, संस्थेच्या माध्यमातून शेतकरी व सभासदांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

शेतकी सहकारी संघ ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. त्यामुळे या संस्थेची जपणूक करताना बदलत्या काळाची गरज ओळखणे आवश्यक आहे. संस्थेच्या भविष्यातील वाटचालीसाठी धाडसी, दूरदृष्टीचे आणि शेतकरीहिताचे निर्णय घेणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे बाळासाहेब थोरात यांनी सांगितले.

अनेक अडचणींवर मात करत संगमनेर शेतकी सहकारी संघ आजही भक्कमपणे उभा आहे. संस्थेच्या आजवरच्या यशस्वी वाटचालीसाठी योगदान देणाऱ्या सर्व आजी-माजी पदाधिकारी, संचालक मंडळ, सभासद बांधव, अधिकारी आणि कर्मचारी यांचे यावेळी अभिनंदन करून आभार व्यक्त करण्यात आले.

या वार्षिक सर्वसाधारण सभेस माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, संस्थेचे चेअरमन संपराव डोंगरे, व्हा. चेअरमन सुनील कडलग, संचालक मंडळाचे सर्व सदस्य, सभासद बांधव, मॅनेजर अनिल थोरात यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पोलीस आणि कुटुंबीयांना एसएमबीटीमध्ये कॅशलेस उपचार

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याच्या उद्देशाने नाशिक येथील एसएमबीटी हॉस्पिटल व 'महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना' अंतर्गत विशेष करार करण्यात आला आहे. या करारामुळे आता पोलीस आणि त्यांच्या कुटुंबियांना अत्याधुनिक वैद्यकीय उपचार पूर्णपणे कॅशलेस अर्थात कुठल्याही प्रकारे पैसे न भरता उपलब्ध होणार आहेत. नाशिक विभागासह संपूर्ण राज्यातील पोलिसांसाठी ही अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी आहे. या उपचार सुविधेचे पोलीस प्रशासन आणि कुटुंबियांकडून स्वागत करण्यात आले आहे.




या योजनेअंतर्गत एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ५० हून अधिक गंभीर आणि आपत्कालीन (ईमरजन्सी) आजारांवर कॅशलेस उपचारांची सोय करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, वॉल्व्ह रिपेअर, वॉल्व्ह रिप्लेसमेंट, यांसारखे हृदयरोगविषयक उपचार तसेच कर्करोग (कॅन्सर), मूत्रपिंड प्रत्यारोपण (किडनी ट्रान्सप्लांट), बीएमटी म्हणजेच अस्थिमज्जा प्रत्यारोपण यांसारख्या गंभीर आजारांवरील शस्त्रक्रियांचा समावेश आहे. याशिवाय रस्ता अपघात, तीव्र मेंदू विकार, पक्षाघात, तीव्र उदर वेदना, (अॅक्युट अॅबडोमिनल पेन) जळीत आणि विषबाधा यांसारख्या आपत्कालीन प्रसंगी तातडीचे मोफत उपचार मिळणार आहेत. तसेच कान-नाक-घसा, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र इमर्जन्सी, डोळ्यांचे विकार आणि लहान मुलांच्या जन्मजात विसंगतीवरील तातडीच्या शस्त्रक्रिया देखील या योजनेंतर्गत समाविष्ट आहेत.

रुग्णांना उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा देण्यासाठी एसएमबीटी हॉस्पिटल सर्व आधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज आहे. याठिकाणी एकाच छताखाली २६ पेक्षा अधिक स्पेशालिटी आणि सुपर स्पेशालिटी सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलमध्ये विविध वैद्यकीय विभागांतील अनुभवी व अतितज्ज्ञ शल्यचिकित्सक, कार्डिओलॉजिस्ट, न्यूरोलॉजिस्ट, ऑन्कोलॉजिस्ट आणि नेफ्रोलॉजिस्ट २४ तास सेवा देत आहेत. रुग्णांच्या तातडीच्या उपचारासाठी अत्याधुनिक व्हेंटिलेटर आणि मॉनिटर्ससह अतिदक्षता विभाग (खउण, उउण, छखउण, झखउण) उपलब्ध आहेत. कोणत्याही संसर्गाशिवाय अवघड शस्त्रक्रिया पार पाडण्यासाठी तब्बल १७ अत्याधुनिक मॉड्यूलर ऑपरेशन थियेटर्स उभारण्यात आली आहेत. अल्ट्रा मोड्युलर कॅथलॅब याठिकाणी उपलब्ध आहे.

याशिवाय सीटी स्कॅन, एमआरआय, डिजिटल एक्स-रे, मॅमोग्राफी आणि पूर्णपणे संगणकीकृत पॅथॉलॉजी लॅबसह २४ तास आपत्कालीन अपघात विभाग, सुसज्ज रुग्णवाहिका व ब्लड बँक यांसारख्या अद्ययावत सोयीसुविधा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत. या कॅशलेस सुविधेमुळे पोलीस कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या चिंतेपासून मोठा दिलासा मिळाला असून, नाशिक पोलीस आयुक्तालयसह व ग्रामीण पोलीस दलातील कर्मचाऱ्यांकडून या उपक्रमाचे मनापासून स्वागत करण्यात आले आहे.

**एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये सर्व सुविधा या अद्ययावत आहेत. हॉस्पिटल एनएबीएच मानांकनप्राप्त आहे. नामांकित कंपन्यांच्या आरोग्यविमा धारकांसाठी कॅशलेस सुविधा याठिकाणी उपलब्ध आहे. याशिवाय हे हॉस्पिटल करन्सी नोटप्रेस कर्मचारी, एमएसईबी कर्मचारी व ईएसआयसी कार्डधारक कर्मचाऱ्यांवर कॅशलेस उपचार करत आहे. रात्रंदिवस नागरिकांच्या सेवेत तत्पर असणाऱ्या या पोलीस बांधवांना आणि त्यांच्या कुटुंबियांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे अत्यंत गरजेचे आहे. या सामाजिक भावनेतूनच एसएमबीटी हॉस्पिटलने 'महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजने'अंतर्गत हा विशेष करार केला आहे. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, निष्णात तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आणि आपत्कालीन सेवा २४ तास सज्ज आहेत. पोलिसांना कोणत्याही आर्थिक अडचणींशिवाय तत्पर आणि सर्वोत्तम कॅशलेस वैद्यकीय सेवा देण्यास आमचे प्रशासन कटिबद्ध आहे.**

**सचिन बोरसे, संचालक,**
**रुग्णसेवा विभाग, एसएमबीटी सेवाभावी ट्रस्ट**

## पान १ वरून संगमनेरच्या...

पान १ वरून

कोकणगाव कृषी मंडलात २५ हजार ४८२ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली असून, त्यापैकी १६ हजार २०० हेक्टर (६३.५७ टक्के) क्षेत्र बाधित झाले आहे. साकूर कृषी मंडलात २२ हजार १४ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून, त्यापैकी १० हजार ३४६ हेक्टर (४७ टक्के) क्षेत्र बाधित झाले आहे. घारगाव कृषी मंडलात १६ हजार ८०७ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली असून, त्यापैकी ६ हजार १११.५ हेक्टर (३६.३६ टक्के) क्षेत्र बाधित झाले आहे. तर संगमनेर कृषी मंडलात १९ हजार ४३८ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली असून, त्यापैकी १ हजार १३५ हेक्टर (५.८४ टक्के) क्षेत्र बाधित झाले असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

## पान १ वरून जरांगेंचे...

पान १ वरून

त्यामुळे पाटोदा येथे विठ्ठल मंदिराच्या भक्तनिवासमध्ये त्यांना सलाईन लावण्यात आले. अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघाल्यानंतर, १२ सप्टेंबरपासून त्यांनी सलाईन घेणे बंद केले होते. त्यांना हात-पाय हलवणे देखील कठीण झाले होते. त्यामुळे त्यांनी उपचार घ्यावेत, अशी मागणी मराठा समाजातील आंदोलक करत होते.

मनोज जरांगे पाटील यांना पुन्हा संघर्ष करण्याची वेळ येणार नाही, अशा पद्धतीने शिंदे समिती काम करेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांनी मराठा समाजाच्या मागणीला सकारात्मक पाठिंबा दिला. भविष्यातही समन्वयाने काम करूयात. मनोज जरांगे यांनी उपोषण स्थगित केलं. सरकारच्या शब्दाला मान दिलं. वेळोवेळी चर्चा सुरूच राहणार आहे. जे काही प्रश्न निर्माण होतील, त्यातून मार्ग काढू. सरकारच्या वतीने, सोबत मंत्री दादा भुसे, आमदार प्रसाद लाड, आमदार सुरेश धस यांच्या सर्वांच्या वतीने, उपसमितीच्या वतीने आभार व्यक्त करतो. जरांगे पाटील यांना जे आश्वासन दिलं आहे.

# रंगारगल्लीमध्ये अथर्वशीर्ष पठणाने भक्तिमय वातावरण

## मोफत आरोग्य तपासणी शिबिरासह महिलांचा सन्मान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्री सोमेश्वर रंगारगल्ली तरुण मित्र मंडळ (ट्रस्ट) व श्री सोमेश्वर रंगारगल्ली गणेशोत्सव महिला मंडळ, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला 'श्री गणपती अथर्वशीर्ष पठण' तसेच 'मोफत आरोग्य तपासणी व सन्मान सोहळा' भक्तिमय, उत्साही आणि मंगलमय वातावरणात पार पडला.

संगमनेर नगरीचे श्रद्धास्थान असलेल्या मानाच्या पहिल्या श्री इच्छापूर्ती गणपतीच्या सान्निध्यात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गणेशोत्सव महिला मंडळाच्या पुढाकाराने आयोजित सामूहिक अथर्वशीर्ष पठणाला महिलांसह गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अथर्वशीर्षाच्या सामूहिक पठणाने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

रंगारगल्ली परिसरासह संपूर्ण संगमनेर शहरातील गणेशभक्त व नागरिकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थिती लावली. धार्मिक वातावरणासोबतच सामाजिक बांधिलकी जपत संगमनेर नगरपरिषद कॉटेज हॉस्पिटलच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा नागरिक व भाविकांनी लाभ घेतला. अथर्वशीर्ष पठणात सहभागी झालेल्या गणेशभक्तांचा उत्साह वाढविण्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या विशेष सहकार्याने सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सहभागींचा सन्मान करून त्यांच्या धार्मिक उपक्रमातील योगदानाला प्रोत्साहन देण्यात आले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्याला सामाजिक बांधिलकी, आरोग्य जागृती आणि सामूहिक सहभागाची जोड देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. धार्मिक परंपरा आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम घडविणारा हा उपक्रम संगमनेरच्या गणेशोत्सवातील एक आदर्श उपक्रम ठरला.

श्री इच्छापूर्ती गणेशाच्या कृपेने सर्वांना सुख, समाधान, समृद्धी आणि निरोगी आरोग्य लाभो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

# गौरी - समृद्धी, सौख्य आणि माणुसकीचा उत्सव

भाद्रपदातील गौरी-महालक्ष्मीचा सण म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील एक अत्यंत पवित्र आणि भावपूर्ण पर्व. आज घरोघरी गौरी अर्थात महालक्ष्मीचे मोठ्या भक्तिभावाने आवाहन केले जाते तर उद्या तिचे विधिवत पूजन केले जाणार आहे. अनेक कुटुंबांमध्ये महालक्ष्मीचे मातृवत स्वरूप मानून तिचे स्वागत केले जाते. घराघरांत उत्साह मंगल वातावरण आणि भक्तीचा सुगंध दरवळताना दिसतो.

'लक्ष्मी' या संकल्पनेचा विचार केला तर तिचे स्वरूप केवळ धन-संपत्तीपुरते मर्यादित राहत नाही. विपरीत मार्गाने वापरली जाणारी संपत्ती म्हणजे 'अलक्ष्मी', स्वार्थासाठी वापरलेले वित्त म्हणजे केवळ संपत्ती; परंतु परार्थासाठी, समाजहितासाठी वापरली जाणारी संपत्ती म्हणजे 'लक्ष्मी' आणि भगवंताच्या कार्यासाठी, सत्कार्यासाठी वापरली जाणारी शक्ती म्हणजे 'महालक्ष्मी', अशी सुंदर संकल्पना आपल्या संस्कृतीने मांडली आहे.

महालक्ष्मीचे आगमन म्हणजे घरात केवळ धन येणे नव्हे, तर समृद्धी, समाधान, सौख्य, आनंद, प्रेम आणि सद्भावना यांचे आगमन होय. म्हणूनच महालक्ष्मीने पुढच्या दाराने, वाजत-गाजत आणि मंगल वातावरणात आपल्या घरात यावे, अशी प्रत्येकाची भावना असते. मागच्या दाराने, चुकीच्या मार्गाने किंवा अनैतिक पद्धतीने आलेली संपत्ती नको, तर कष्ट, प्रामाणिकपणा आणि सत्कार्यातून मिळालेली लक्ष्मी हवी, हाच या उत्सवामागील खरा संदेश आहे. महालक्ष्मी ही शक्तीचे रूप मानली जाते. आपण शक्तीचे उपासक आहोत. भक्तिभावाने तिचे आवाहन करून, तिची पूजा-अर्चना करून ती आपल्या घरात कायमस्वरूपी नांदावी, अशी प्रार्थना केली जाते. महालक्ष्मी म्हणजे जीवन सार्थक करण्याची शक्ती आहे. त्यामुळे तिच्या पूजनातून केवळ भौतिक समृद्धीची अपेक्षा न करता जीवनात सद्विचार, समाधान आणि सत्कर्मांची समृद्धी निर्माण करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.



पार्वती, उमा म्हणजे गौरी आणि विष्णुपत्नी महालक्ष्मी-या दोन्ही स्वरूपांना भारतीय परंपरेत विशेष स्थान आहे. 'अपराजितपृच्छा' या ग्रंथातही गौरीच्या संदर्भाचा उल्लेख आढळतो. पौराणिक कथेनुसार, असुरांच्या त्रासाला कंटाळलेल्या स्त्रिया गौरी-महालक्ष्मीची आराधना करून आपले सौभाग्य अक्षय राहावे, अशी प्रार्थना करतात. गौरीने असुरांचा संहार करून त्यांना अभय दिले आणि त्यांचे सौभाग्य अक्षय केले. तेव्हापासून स्त्रिया श्रद्धेने गौरी-महालक्ष्मीचे पूजन करू लागल्या, अशी आख्यायिका सांगितली जाते. हा सण केवळ धार्मिक विधी नसून तो कुटुंब, समाज आणि नातेसंबंधांना जोडणारा उत्सव आहे. महाराष्ट्रातील विविध समाजघटकांमध्ये हा सण कुलाचार म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गौरीच्या आगमनापासून ते पूजनापर्यंत घराघरांत वेगवेगळ्या प्रथा, परंपरा आणि लोकाचार पाहायला मिळतात. लोकसाहित्यातही गौरीपूजनाचे अनेक भावस्पर्शी उल्लेख आणि गीते आढळतात.

**आली आली लक्ष्मी आली, तशी जाऊ नको,**
**बाळाला सांगते, धरला हात सोडू नको...**

अशा गीतांमधून महालक्ष्मीविषयीची माया, आपुलकी आणि भक्तिभाव व्यक्त होतो. तसेच,

**मला आहे हौस चांदीच्या ताटाची,**
**लक्ष्मीच्या नैवेद्याला मूठ साखरभाताची...**

या ओळींमधून ग्रामीण आणि लोकजीवनाशी जोडलेली श्रद्धा, साधेपणा आणि आनंदाचे दर्शन घडते.

गौरी-महालक्ष्मीच्या निमित्ताने एक महत्त्वाची सामाजिक परंपराही जपली जाते. एकमेकांच्या घरी जाऊन गौरीचे दर्शन घेणे, कुशल विचारणे, आपुलकीने संवाद साधणे यामुळे नाती अधिक घट्ट होतात. अनेकदा वर्षानुवर्षे संपर्कात नसलेली माणसेही या निमित्ताने एकमेकांच्या घरी जातात. नवीन ओळखी निर्माण होतात, जुने संबंध दृढ होतात आणि माणूस माणसाशी जोडला जातो. खरे पाहता, सणांचा मूळ उद्देश हाच आहे. उत्सवाच्या माध्यमातून माणसांमध्ये प्रेम, आपुलकी, सहकार्य आणि मानवता टिकवून ठेवणे. आजच्या धावपळीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात ही सामाजिक जवळीक अधिक महत्त्वाची ठरते. महालक्ष्मी म्हणजे समृद्धीचे, सौख्याचे, आनंदाचे आणि प्रेमाचे प्रतीक आहे. तिच्या पूजनातून आपण केवळ धनाची नव्हे, तर अविनाशी लक्ष्मीची-सद्बुद्धी, समाधान, प्रेम, माणुसकी आणि सत्कर्मांची-मागणी करावी. आपल्या घरात आलेली लक्ष्मी समाजहितासाठी आणि सत्कार्यासाठी उपयोगी पडावी, हीच या मंगल पर्वाची खरी शिकवण आहे.

आज भक्तिभावाने महालक्ष्मीचे आवाहन करताना एकच प्रार्थना करूया-हे मातृस्वरूपे महालक्ष्मी, आमच्या घरात सुख-समृद्धीसोबत प्रेम, समाधान, सद्विचार आणि माणुसकी कायम नांदू दे. तुझे मंगलमय वास्तव्य आमच्या घरात आणि अंत:करणात सदैव राहू दे!

**– प्रा. शशांक गंधे**
**मो. ९८९०१६३६४२**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# आपत्कालीन प्रसंगी युवकांनी धावून जावे- डॉ. जयश्रीताई थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -सध्याच्या धावपळीच्या युगामध्ये अनेक नागरिकांना आरोग्याची अचानक आपत्कालीन समस्या निर्माण होतात. आशावेळी त्या व्यक्ती व कुटुंबातील इतर नागरिक घाबरून जातात. अशा परिस्थितीमध्ये आपत्कालीन वैद्यकीय उपाययोजनाबाबत युवकांनी तात्काळ मदतीसाठी सदैव तयार असावे असे आवाहन युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केले असून याबाबत संगमनेर तालुक्यातील युवकांना तातडीने करावयाच्या आपतकालीन वैद्यकीय उपायोजनांबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.



एसएमबीटी दंत महाविद्यालय येथे संगमनेर तालुक्यातील युवक काँग्रेसचे पदाधिकाऱ्यांना आपत्कालीन वैद्यकीय उपाययोजनांबाबत प्रशिक्षण देण्यात आले यावेळी त्या बोलत होत्या यावेळी समवेत डॉ. रुचिरा खानसे, डॉ कल्पेश पारख, डॉ. मीरा डॉ. पद्मनाभन, अविनाश आव्हाड, सोमनाथ गुंजाळ, सुविधा अरासिद्ध यांच्यासह युवा काँग्रेसचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रशिक्षणामध्ये हार्ट अटॅक, सर्पदंश, फिट येणे, चक्कर येणे, एक्सीडेंट, विष प्रयोग, उष्माघात याबाबत करावयाच्या प्राथमिक उपाययोजनांबाबत सर्व युवकांना प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, समाजामध्ये सध्या धावपळीमध्ये प्रत्येकाचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यातून हार्ट अटॅक सारखे प्रसंग उद्भवतात आपल्या परिसरात किंवा कुटुंबात जर एखाद्या व्यक्तीला हार्ट अटॅक आला, गावामध्ये कुणाला सर्पदंश झाला, फिट येणे,चक्कर येणे, किंवा वाढत्या वाहतुकीमुळे एक्सीडेंट होणे अशा वेळी युवकांनी प्रशिक्षण घेतले असल्याने त्यांना त्या व्यक्तीला दवाखान्यापर्यंत पोहोचवण्या अगोदर प्राथमिक आपत्कालीन उपाययोजना करून सदर व्यक्तीचा जीव वाचवता येतो. हे आपत्कालीन वैद्यकीय प्रशिक्षण समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक युवकाने इतरांच्या तात्काळ मदतीसाठी तयार राहावे असे आवाहन केले.

तर डॉ.रुचिरा खाणसे म्हणाल्या की, हार्ट अटॅक आल्यानंतर सर्वप्रथम त्या व्यक्तीचा श्वास चालू राहण्यासाठी आपण पूर्ण दाबाने छाती दाबली पाहिजे. वैद्यकीय मदत पोहोचण्यापूर्वी आपल्याला त्याचा जीव वाचवणे गरजेचे आहे याकरता छाती पंपिंग करणे आवश्यक असते. तर फिट येणे किंवा विष प्रयोग झाला असल्यास त्या व्यक्तीला पाणी देऊ नये. तर डॉ. कल्पेश पारक म्हणाले की, पॅरलेसिस, अटॅक यासारख्या घटनांमध्ये प्रत्येक घटनेनंतर एक गोल्डन टाईम असतो तो साधण्यासाठी युवकांनी प्रयत्न करावा त्यातून कोणाचा तरी जीव वाचणार आहे. हे प्रशिक्षण नक्कीच सर्वांच्या भावी आयुष्यासाठी उपयोगी ठरणार आहे. या प्रथमोपचारातून कोणाचातरी जीव वाचणार असल्याचे ते म्हणाले.

# सायकलवरून देश-विदेश भ्रमंती

## मारुती कडाळेंची ३६ वर्षांची अविरत सायकलवारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव : ग्रामपंचायत कर्मचारी श्री. मारुती कडाळे (वय ५७ वर्षे) यांनी सायकलच्या माध्यमातून देश-विदेश भ्रमंतीचा अनोखा छंद जोपासला आहे. सन १९९० पासून सुरू असलेली त्यांची सायकल वारी आजतागायत अविरत सुरू आहे.

श्री. कडाळे यांनी नेपाळ, अफगाणिस्तान, पाकिस्तान, म्यानमार, बांगलादेश, चीन, ब्रह्मदेश, तिबेट आणि भूतान या देशांमध्ये सायकल वारी पूर्ण केली आहे. विदेशी सायकल वारीबरोबरच त्यांनी संपूर्ण भारतभरही सायकलवरून भ्रमंती केली आहे.

ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून आपली जबाबदारी सांभाळत त्यांनी सायकल प्रवासाची आवड जपली आहे. गेल्या अनेक




वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रवासातून त्यांनी विविध देशांतील संस्कृती, निसर्ग आणि जनजीवन जवळून अनुभवले आहे.

पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. प्रविण सिनारे यांनी श्री. मारुती कडाळे यांच्या सायकल प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी सहाय्यक गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर, सहाय्यक प्रशासन अधिकारी राजेश तिटमे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी गणेश तोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

१९९० पासून आजतागायत सुरू असलेली त्यांची सायकल वारी ही जिद्द, साहस आणि भ्रमंतीच्या आवडीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# अखेर संतोष पंडित यांना जामीन मंजूर



पुणे (वृत्तसंस्था)

सामाजिक कार्यकर्ते संतोष पंडित यांना अखेर जामीन मंजूर झाला आहे. त्यांना पंचवीस हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर हा जामीन मंजूर करण्यात आला आहे. भारतीय जनता पक्षाचे नेते आणि राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर एक वादग्रस्त व्हिडिओ बनवल्याचा आरोप संतोष पंडित यांच्यावर होता. या आरोपावरून त्यांच्याविरोधात कोथरूड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. संतोष पंडित यांनी चंद्रकांत पाटील यांच्याविषयी काही टीकात्मक विधानं केली होती, ज्याचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. याच व्हायरल व्हिडिओसंदर्भात एका महिलेने पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा नोंदवून संतोष पंडित यांना अटक केली होती.

या घटनेमुळे राज्याच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात बरीच चर्चा सुरू झाली होती. संतोष पंडित यांच्या जामीन अर्जावर सुनावणी झाल्यानंतर त्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. या प्रकरणातील पुढील कायदेशीर प्रक्रिया आता सुरू राहील, परंतु सध्या तरी पंडित यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

# सुकेवाडी कान्होबा देवस्थानात भक्तीमय गणेशोत्सव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथे वसलेले श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील सातवे महत्त्वाचे नाथ सिद्धपीठ म्हणून मानले जाते. ग्रामीण भागातील भक्तीभावाची परंपरा आणि नाथसंप्रदायाची साधना यांचे सुंदर दर्शन या देवस्थानात घडते. सुकेवाडी ग्रामस्थांनी पिढ्यान्पिढ्या जपलेल्या धार्मिक परंपरेमुळे हे देवस्थान परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे.

सालाबादप्रमाणे यंदाही सुकेवाडी ग्रामस्थांच्या वतीने कान्होबा देवस्थानात गणपती उत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या काळात दररोज विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गणपती बाप्पांच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत देवस्थान परिसरात भक्तिमय वातावरण असते. पाचव्या दिवशी भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले जाते. दहा दिवसांच्या उत्सवानंतर गणपती बाप्पांचे विधिवत पाण्यात विसर्जन करण्यात येते.

देवस्थानात हिंदू धार्मिक रितीरिवाजांनुसार दररोज श्री कान्होबा महाराजांच्या समाधीची अत्यंत श्रद्धेने पूजा केली जाते. समाधीला स्वच्छ पाण्याने स्नान घालून गंध, हार-फुले अर्पण केली जातात. सकाळी ६ वाजता गणपती बाप्पा, दत्त महाराज, कान्होबा देव व नवनाथांची आरती होते. सायंकाळी ७.३० वाजता आरती केली जाते. दर गुरुवारी विशेष महाआरतीचे आयोजन करण्यात येते.



महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाते.

देवस्थानातील सर्व धार्मिक विधी आणि पूजा सुकेवाडी ग्रामस्थांच्या सहभागातून पार पडतात. ग्रामस्थांनी देवस्थानासाठी अधिकृत हिंदू पुजारी म्हणून आकाश शशिकांत सातपुते व अशोक महादू खर्डे यांची नियुक्ती केली असून, हे दोघेही नित्य पूजा व विविध धार्मिक विधी पार पाडत आहेत.

देवस्थानातील नित्य पूजेसाठी हार, कापूर, तूप, तेल, गुलाबजल, अत्तर, अष्टगंध, चंदन, धूप, कापूस, वाती, भस्म, खडीसाखर आदी विविध पूजासाहित्याचा वापर केला जातो. ऑगस्ट २०२६ या महिन्यातील ३१ दिवसांसाठी या पूजासाहित्याचा सुमारे तीन हजार रुपयांचा खर्च झाला. हा खर्च सुकेवाडी गावातील नाथसेवेकरी नानासाहेब एकनाथ कुटे, प्रकाश मुरलीधर सातपुते, सिद्धांत संदीप गुंजाळ, सचिन नवनाथ गांजेवे तसेच श्री स्वामी समर्थ सेवेकरी, सुकेवाडी यांनी वस्तू स्वरूपात केला. देवस्थानात दर पौर्णिमेला विधिवत होम-हवनाचे आयोजन केले जाते. यासाठी श्रीफळ, तूप, साखर, सुपारी, बदाम, हळकुंड, खारीक, खोबरे, काळे तीळ, सातू, गुगळे, धूप, पेढे, गहू, तांदूळ, पंचामृत, फुले व फळे आदी पूजासाहित्याचा वापर केला जातो. या साहित्याचा सुमारे चार हजार रुपयांचा खर्च सुकेवाडीतील नाथसेवेकरी संदीप शिवाजी वर्पे, भाऊसाहेब रामनाथ सातपुते, नितीन बबन गुंजाळ, भाऊसाहेब राधाकिसन सातपुते, नवनाथ गणपत शेटे व मारुती रामनाथ सातपुते यांनी वस्तू स्वरूपात केला.

सुकेवाडीतील श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे केवळ धार्मिक स्थळ नसून ग्रामस्थांच्या एकोप्याचे, सेवाभावाचे आणि श्रद्धेचे प्रतीक ठरले आहे. नित्य पूजा, सकाळ-सायंकाळची आरती, गुरुवारची महाआरती, पौर्णिमेचा होम-हवन आणि महाप्रसादाच्या माध्यमातून येथे भक्तीची अखंड ज्योत तेवत ठेवली जात आहे. ग्रामस्थांच्या सामूहिक सहभागातून धार्मिक परंपरा जपली जात असल्याने सुकेवाडीचे हे नाथ सिद्धपीठ भाविकांसाठी श्रद्धा आणि अध्यात्माचा केंद्रबिंदू ठरत आहे.

# पेसातील उमेदवारांना सेवेत घ्या

## अकोले पंचायत समिती कार्यालयासमोर धरणे आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- पेसा क्षेत्रातील स्थानिक आदिवासी मानधन तत्त्वावरील उमेदवारांना तात्काळ सेवेत कायम सामावून घेण्याबरोबरच विविध मागण्यासाठी १५ सप्टेंबरपासून अकोले पंचायत समिती कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू आहे.

पुणे येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी प्रतिनिधी व पेसा कर्मचारी प्रतिनिधी यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी दि.२९ रोजी बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व पेसा कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सूचना तसेच विविध मागण्यांसाठी दि. ६ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय, अकोले येथे काढलेला पेसा जनआक्रोश मोर्चा आणि पेसा कृती समिती यांच्या वतीने आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या मागण्या, पेसा कर्मचारी यांना सेवेत कायम करणे व इतर मागण्यांसाठी दि. २४ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत एकात्मिक




आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर येथे केलेले १२ दिवसांचे धरणे आंदोलन या पार्श्वभूमीवर या प्रश्नांकडे शासनाचे व प्रशासनाचे तात्काळ लक्ष वेधण्यासाठी दि. १५ सप्टेंबर पासून अकोले पंचायत समिती कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे.

कार्यरत व कार्यमुक्त असलेल्या सर्व पेसा मानधन कर्मचारी यांना त्याच पदावर व त्याच जागी तात्काळ सेवेत कायम सामावून घ्यावे. तर दि. ५ ऑक्टोबर २०२४ व ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पेसाच्या विरोधात काढलेले शासन निर्णय तात्काळ रद्द करावेत. सदर शासन निर्णयांना कुठलाही बेस नाही तसेच जनजाती सल्लागार समिती व राज्यपाल यांच्या अधिसूचनेचा कुठलाही बेस नाही, त्यामुळे हे शासन निर्णय तात्काळ रद्द करावेत. आणि पेसा ग्रामसभा व पैसा कायद्यानुसार आदिवासी समाजाला प्राप्त असलेल्या सर्व हक्कांची पूर्णपणे अंमलबजावणी करावी. तसेच पेसा ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या ५ टक्के निधीमध्ये महागाई व वाढत्या गरजांचा विचार करून दरवर्षी वाढ करावी. अकोले तालुक्याच्या पश्चिम भागातील घोषित केलेली ४८ गावे इको-सेंसिटिव्ह झोनमधून तात्काळ वगळावीत. कारण या ठिकाणी पेसा कायदा व ग्रामसभा यांचा कुठेही विचार केलेला नाही व संबंधित ग्रामसभा व स्थानिक आदिवासी समाजाला विचारात घेतलेले नाही. त्यामुळे सदर निर्णय तात्काळ रद्द करावा.

विद्यार्थ्यांना ताजे, सकस, पौष्टिक व सुरक्षित अन्न उपलब्ध करून द्यावे. आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना जेवण म्हणून सेंट्रल किचनच्या माध्यमातून विष खायला घालत आहे.

# मुंबई-नाशिक महामार्गावर भीषण अपघात; चौघांचा मृत्यू

मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबई-नाशिक महामार्गावर भिषण अपघाताची घटना घडली आहे. या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६ जण जखमी झाल्याची माहिती आहे. तर मृत्यूमध्ये लहान मुलांचा देखील समावेश आहे. मुंबई नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यातील अटगाव जवळ दोन वर्षांपूर्वी जळालेल्या उभ्या असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला, अशी माहिती आहे. दरम्यान, हे सर्व जोगेश्वरी येथील रहाणारे होते. देव दर्शनासाठी कुटुंबासह त्र्यंबकेश्वरला गेले होते. दरम्यान परतीच्या प्रवासात अटगाव जवळ हा भिषण अपघात झाला अशी माहिती आहे. या अपघातात ४ जणांचा जागीच मृत्यू झाला असून यात दोन लहान मुलाचा देखील समावेश आहे. तर ६ जण जखमी झाले असून यांच्यावर शहापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ऋषिपंचमीनिमित्त काल मध्यप्रदेशमधील सौंसर इथं गेलेल्या भाविक महिलांच्या वाहनाला पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात वाहन चालकाचा घटनास्थळीचं मृत्यू झाला. तर, वाहनातील चार महिला गंभीर जखमी तर, उर्वरित महिला किरकोड जखमी झाल्यात. ही घटना मध्यप्रदेशातील पांढुर्णा जिल्ह्यातील सौंसर तालुका अंतर्गत येणाऱ्या तीनखेडा या गावात घडली. आदित्य मांढरे (२४) असं मृत वाहन चालकाचं नावं आहे. तर, जखमींमध्ये मंगला ठवकर, रेणा चौधरी, जयश्री झंजाळ, शीला तीतिरमारे यांचा समावेश आहे. जखमींवर सौंसर येथील शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत असून सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे माहिती मिळत आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मुंबई लेनवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. वसई तालुक्यातील खानिवडे टोलनाक्यापासून सकवारपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहनचालक हैराण झाले आहेत.

# गणित-विज्ञानाची भीती दूर; चिकित्सक विचारांची नवी दृष्टी ! - डॉ. निवास पाटील

संगमनेर (प्रतिनिधी) गणेशोत्सवाचे औचित्य साधून सायखिंडी येथील श्री मनोहरबाबा विद्यालयात मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'श्री मनोहर व्याख्यानमाले'ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करण्याच्या उद्देशाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

या व्याख्यानमालेत नाशिक येथील डॉ. निवास पाटील निवृत्त प्राध्यापक तथा राज्य पुरस्कार विजेते यांनी गणित व विज्ञान विषयांवर विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. केवळ पाठांतरावर भर न देता प्रत्येक गोष्टीमागील 'का?' आणि 'कसे?' यांचा शोध घेण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी विकसित करावी, असे आवाहन त्यांनी केले.

दैनंदिन जीवनातील विविध उदाहरणे, प्रयोगशीलता आणि तर्कशुद्ध विचारांची सांगड घालत डॉ. पाटील यांनी गणित व



विज्ञान हे विषय विद्यार्थ्यांसमोर अत्यंत रंजक पद्धतीने मांडले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये या विषयांविषयीची उत्सुकता वाढली असून विज्ञानाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक होण्यास मदत झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतरत्न राजीव गांधी विद्यालय, निमजचे माजी मुख्याध्यापक शांताराम डोंगरे होते. त्यांनी ऋषिपंचमी तसेच अभियंता दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान यांचा परस्पर संबंध स्पष्ट करताना विद्यार्थ्यांनी सतत जिज्ञासू वृत्ती जोपासावी, असे त्यांनी सांगितले.

'खरा शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनाचे परिवर्तन घडवतो'

"- True Teacher Transforms a Soul' या विचारातून शिक्षकांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण भूमिकेवरही यावेळी प्रकाश टाकण्यात आला. शिक्षकांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा मिळते आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडते, हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनिता डांगे यांनी केले, तर सूत्रसंचालन गजानन गायकवाड यांनी केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# संपादकीय...

## महागाईने सामान्यांची होरपळ...

महागाई हा आता केवळ अर्थशास्त्रातील आकडा राहिलेला नाही; तो सामान्य माणसाच्या रोजच्या जगण्याचा प्रश्न बनला आहे. बाजारात गेल्यावर खिशातील पैसे किती वेगाने कमी होतात, याचा अनुभव प्रत्येक कुटुंब घेत आहे. किराणा, भाजीपाला, दूध, गॅस, शिक्षण, आरोग्य, प्रवास, घरभाडे अशा जीवनावश्यक गरजांच्या खर्चात सातत्याने वाढ होत असल्याने कुटुंबाचे आर्थिक गणित बिघडत आहे. उत्पन्न वाढण्याचा वेग आणि खर्च वाढण्याचा वेग यांच्यातील दरी दिवसेंदिवस रुंदावत आहे. या दरीत सर्वाधिक भरडला जात आहे तो मध्यमवर्ग आणि अल्प उत्पन्न गट. महागाईची सर्वात मोठी झळ ही रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना, छोट्या व्यावसायिकांना, शेतमजुरांना आणि निश्चित पगारावर संसार चालविणाऱ्या कुटुंबांना बसते. महिन्याच्या सुरुवातीला आखलेले बजेट महिनाअखेरीस कोलमडते. किराणा यादीतील अनेक वस्तू कमी प्रमाणात घ्याव्या लागतात. पूर्वी सहज परवडणाऱ्या वस्तूंचा विचार आता अनेकदा करावा लागतो. बचत करणे तर दूरच; अचानक आलेला वैद्यकीय खर्च किंवा मुलांच्या शिक्षणाचा अतिरिक्त खर्च कुटुंबाला कर्जाच्या दारात नेतो. महागाईचा परिणाम केवळ स्वयंपाकघरापुरता मर्यादित नाही. शिक्षणाचा खर्च वाढल्याने पालकांवर आर्थिक ताण वाढतो. खासगी शाळांची फी, पुस्तके, गणवेश, वाहतूक, शिकवणी यांचा खर्च अनेक कुटुंबांना परवडेनासा होत आहे. दुसरीकडे आरोग्यसेवेचा खर्च वाढत असल्याने आजारपण ही आर्थिक चिंतेची बाब बनली आहे. सामान्य कुटुंबाला चांगले शिक्षण आणि दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी मोठी किंमत मोजावी लागत आहे. शेतकऱ्यांची परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. बियाणे, खते, औषधे, मजुरी, वीज, सिंचन आणि वाहतूक यांचा उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला हमखास आणि योग्य दर मिळेलच याची खात्री नसते. एका बाजूला उत्पादन खर्च वाढतो आणि दुसऱ्या बाजूला बाजारभावातील अनिश्चितता कायम राहते. त्यामुळे महागाईचा फायदा उत्पादकाला मिळण्याऐवजी अनेकदा मध्यस्थांच्या साखळीतच तो अडकतो. शेतकऱ्याला उत्पादनासाठी महागाई आणि विक्रीच्या वेळी भावाची चिंता, अशी दुहेरी कोंडी निर्माण होते. महागाई वाढली की केवळ वस्तू महाग होत नाहीत, तर माणसाच्या अपेक्षाही कमी होतात. बचत, घर खरेदी, मुलांचे उच्च शिक्षण, व्यवसायाचा विस्तार, भविष्यासाठी गुंतवणूक अशा अनेक गोष्टी पुढे ढकलल्या जातात. याचा परिणाम देशाच्या आर्थिक विकासावरही होतो. सामान्य नागरिकाच्या हातात खर्च करण्यासाठी पैसा उरला नाही, तर बाजारातील मागणी कमी होते. छोट्या दुकानदारापासून मोठ्या उद्योगापर्यंत त्याचे परिणाम जाणवू शकतात. सरकारकडून महागाई नियंत्रणासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. मात्र, केवळ महागाईचा दर कमी झाल्याची घोषणा करून प्रश्न सुटत नाही. सामान्य नागरिकाच्या प्रत्यक्ष खर्चात किती घट झाली, त्याच्या उत्पन्नात किती वाढ झाली आणि त्याची क्रयशक्ती किती सुधारली, हे महत्त्वाचे आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवणे, साठेबाजी व कृत्रिम टंचाईवर कठोर कारवाई करणे, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य मोबदला मिळवून देणे आणि रोजगाराच्या संधी वाढविणे आवश्यक आहे. विशेषतः मध्यमवर्गासाठी सरकारने स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज आहे. करांचा भार, शिक्षणाचा खर्च, आरोग्याचा खर्च आणि घरगुती खर्च सांभाळताना मध्यमवर्गाची बचत कमी होत आहे. हा वर्ग ना मोठ्या सवलतींचा लाभार्थी ठरतो, ना आर्थिक संकटातून सहज बाहेर पडू शकतो. त्यामुळे कररचनेपासून सार्वजनिक आरोग्य व शिक्षणापर्यंत सर्वच क्षेत्रांत सामान्य नागरिकाला दिलासा देणारी धोरणे आवश्यक आहेत. महागाईचा सामना करण्याची जबाबदारी केवळ सरकारची नाही. ग्राहकांनीही अनावश्यक खर्च टाळणे, स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देणे, बचतीची सवय वाढविणे आणि आर्थिक नियोजन करणे गरजेचे आहे. मात्र, नागरिकांना काटकसरीचा सल्ला देताना त्यांच्या मूलभूत गरजांचा खर्चच आवाक्याबाहेर जाणार नाही, याची काळजी शासनाने घेणे तितकेच आवश्यक आहे. महागाईच्या वणव्यात सामान्य माणूस होरपळत असताना विकासाचे आकडे त्याला दिलासा देत नाहीत; त्याला हवा आहे तो जगण्याचा आधार. स्वस्त आणि सहज उपलब्ध जीवनावश्यक वस्तू, चांगले शिक्षण, परवडणारी आरोग्यसेवा, स्थिर रोजगार आणि उत्पन्नाला साजेशी क्रयशक्ती मिळाली, तरच आर्थिक विकासाचा खरा अर्थ सामान्यांच्या जीवनात दिसेल. सरकारने महागाईकडे केवळ आकडेवारी म्हणून न पाहता प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरातून तिचे वास्तव समजून घेतले पाहिजे. कारण देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्याचा खरा मापदंड शेअर बाजारातील तेजी नव्हे, तर सामान्य माणसाच्या चेहऱ्यावरचा आर्थिक ताण कमी होणे हा आहे.

# अकोले नगरपंचायतीचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश

## निबंध व सजावट स्पर्धा १४ ते २२ सप्टेंबर



युवावार्ता(प्रतिनिधी )

अकोले- अकोले नगरपंचायतीमार्फत 'माझी वसुंधरा अभियान ७.०' व 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६-२७' अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सव - निसर्गाशी नाते जपणारा उत्सव या संकल्पनेखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता योगा भवन, अकोले येथे उत्साहात संपन्न झाली. कार्यशाळेत विविध शाळांमधील सुमारे १२५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन देण्यात आले.

या कार्यशाळेत अभिनव पब्लिक स्कूल, परफेक्ट इंग्लिश मीडियम स्कूल, अगस्ती विद्यालय व कन्या विद्यालय या शाळांमधील जवळपास १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

नगरपंचायतीमार्फत नागरिकांनी शाडू मातीच्या व पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करावा, पीओपीच्या मूर्ती, प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळावा, नैसर्गिक रंगांचा वापर करावा, ध्वनिप्रदूषण टाळावे तसेच निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन नगरपंचायतीच्या कृत्रिम तलावात करावे, असेही सांगण्यात आले.

'गणेशोत्सव निबंध स्पर्धा' दि. १४/०९/२०२६ ते २२/०९/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी दि. २१/०९/२०२६ पर्यंत नगरपंचायतीच्या शहर स्वच्छता विभागात नाव नोंदणी करावी. या कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. सोनाली नाईकवाडी, उपनगराध्यक्ष शरद नवले, मुख्याधिकारी धनश्री पवार, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, नगरसेवक इंजि. प्रदीपराज नाईकवाडी, विजय पवार, नवनाथ शेटे, सागर चौधरी तसेच अमोल वैद्य, सोमेश्वर धुमाळ,रविंद्र शेणकर,नवनाथ मोहिते, मोसीन शेख यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करूया, जलप्रदूषण व ध्वनिप्रदूषण टाळूया आणि स्वच्छ, सुंदर व हरित अकोले घडवू या, असे आवाहन अकोले नगरपंचायतीमार्फत करण्यात आले आहे.

# श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूटमध्ये कृषि संस्कृती व उद्योजकतेचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी (बोटा) - येथील श्री बाळेश्वर शैक्षणिक व कृषी विकास फाउंडेशन संचलित श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूटमध्ये गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी बैलपोळा सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी बैलांचे विधिवत पूजन करून शेतकरी आणि बैल यांच्यातील अतूट नात्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. आनंद विठ्ठलराव सोळंके उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, बैल हा शेतकऱ्याचा खरा साथीदार आहे. आधुनिक यंत्रे आली असली तरी बैलाची जागा कोणीही घेऊ शकत नाही.

आदिदिशा सीडचे CEO व Co-Founder अंकुश आनंद सोळंके यांनी बैलपोळ्याचे कृषी संस्कृतीतील महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, बैलपोळा हा आपल्या कृषी संस्कृतीचा आत्मा आहे. आजच्या युवकांनी शेतीकडे आधुनिक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. सीड इंडस्ट्री आणि ॲग्री बिझनेस क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजक होण्याचा प्रयत्न करावा.

बाळेश्वर शैक्षणिक व कृषी विकास फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव मुरलीधर पोखरकर म्हणाले, शेतकऱ्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. बैलपोळा हा केवळ सण नसून शेतकरी आणि त्याच्या पशुधनाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे.

संस्थेचे सचिव डॉ. अमित शिवाजीराव पोखरकर यांनी सांगितले, विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच व्यावहारिक ज्ञान आणि आपल्या संस्कृतीची ओळख करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. बैलपोळा साजरा करून आपण आपल्या कृषी संस्कृतीशी जोडलेले आहोत, हे अधोरेखित केले आहे.

डेअरी डिप्लोमा विभागाचे प्राचार्य गोकुळ भागवत कुदळ यांनी गो-संवर्धनाचे महत्त्व सांगताना, गो-संवर्धन आणि बैलांचे संगोपन ही काळाची गरज आहे. दूध व्यवसायाचा पाया गोवंशावरच अवलंबून आहे. बैलाची सेवा म्हणजे शेतीची सेवा होय, असे मत व्यक्त केले. ॲग्री पॉलिटेक्निकच्या प्रभारी प्राचार्य सौ. आशा राहाणे म्हणाल्या, बैलपोळ्यासारख्या सणांमुळे विद्यार्थ्यांना शेतकरी आणि त्याच्या कष्टांची जाणीव होते. अशा पारंपरिक सणांमधून विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचे खरे शिक्षण मिळते. विद्यार्थ्यांनी शेतीचा अभिमान बाळगून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कृषी क्षेत्रात नवनवीन संधी निर्माण कराव्यात.

## ग्रामपंचायत निमगाव खैरी, ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर

**संक्षिप्त निविदा नोटीस १५ वा वित्त आयोग सन २०२०/२१ व २०२५/२६ विकास कामे**

खालील कामांच्या मोहरबंद ब-१ निविदा, दोन लिफापे पद्धतीनुसार मा. सरपंच ग्रामपंचायत निमगाव खैरी ता. श्रीरामपुर यांचे वतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. या कामाच्या कोऱ्या निविदा ग्रामपंचायत निमगाव खैरी या कार्यालयात दि. १८/०९/२०२६ ते २५/०९/२०२६ पर्यंत ग्रामपंचायत निमगाव खैरी ता. श्रीरामपुर निविदा फी भरल्यास देण्यात येतील मोहरबंद निविदा ग्रा.पं. निमगाव खैरी कार्यालयात दिनांक २६/०९/२०२६ पर्यंत स्विकारून शक्यतो त्याच दिवशी सकाळी ११:०० वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्रं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | नोंदणीकृत ठेकेदाराचा वर्ग | सुरक्षा अनामत १ टक्के ठेकेदाराचे वर्गीकरानुसार | योजना |
|---|---|---|---|---|---|
| १. | इंदिरा नगर बंदिस्त गटार करणे | ४२३६५०/- | सु.भे.अभियंता | ४२३६/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ |
| २. | भाकरे घर ते झोपडपट्टी परिसर बंदिस्त गटार करणे | ३२६४१४/- | सु.भे.अभियंता | ३२६५/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ |
| ३. | महादेव मंदिर ते मुख्य रस्ता बंदिस्त गटार करणे | ४२३३७८/- | सु.भे.अभियंता | ४२३४/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ |
| ४. | स्मशान भूमी दुरूस्त करणे | १२४०००/- | खुला | १२४०/- | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२६ |
| ५. | पिण्याचे पाणी फिल्टरसाठी चिलिंग बसविणे | ८४६४०/- | खुला | ८४६/- | १५ वा वित्त आयोग सन २०२०/२१ |

**काम पुर्ण करण्याचा कालावधी ३ महिने, निविदेचा प्रकार ब-१ निविदा, कोऱ्या निविदा संचाची किंमत २३६**

निविदा मागणी कालावधी दि. १८/०९/२०२६ ते २५/०९/२०२६

टीप:- १) उपरोक्त कामाच्या निविदा कोणतेही कारण न दाखविता स्वीकारण्याच्या किंवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच/ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत निमगाव खैरी ता. श्रीरामपुर यांनी राखीव ठेवला आहे.

२) ठेकेदाराने कोऱ्या निविदा संचाचे अर्जासोबत अद्यावत नोंदणी दाखल्याच्या, PAN क्रमांक, GST क्रमांक प्रती जोडणे आवशक आहे.

३) कामाचा व कामावरील मजुरांचा शासकीय विमा उतरवणे ठेकेदारास बंधनकारक

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. निमगावखैरी, ता. श्रीरामपूर, जि. अ.नगर**

**सरपंच**
**ग्रा.पं. निमगावखैरी, ता. श्रीरामपूर, जि. अ.नगर**

# महाप्रसाद, भंडाऱ्यासाठी FDA ची परवानगी घ्या !

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- सणासुदीच्या पार्श्वभूमीवर सामूहिक अन्नवाटप, महाप्रसाद, भंडारा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. अशा सामूहिक अन्नवाटपासाठी अन्न औषध प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. यासाठी आयोजकांनी अन्न औषध प्रशासनाच्या http://festivals.mahafda.in या ऑनलाइन पोर्टलवर विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

महाप्रसाद, भंडारा तसेच इतर कोणत्याही स्वरूपात मोफत अन्नप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्यास संबंधित आयोजकांनी कार्यक्रमाच्या *किमान ७ दिवस आधी* आवश्यक माहिती भरून ऑनलाइन पोर्टलद्वारे अन्न औषध प्रशासनाकडे परवानगी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळे, नवरात्रोत्सव मंडळे तसेच विविध सण-उत्सवानिमित्त सामूहिक अन्नवाटपाचे आयोजन करणाऱ्या संस्था व आयोजकांनी विहित मुदतीत अन्न औषध प्रशासनाकडे ऑनलाइन अर्ज दाखल करून पूर्वपरवानगी प्राप्त करावी. पूर्वपरवानगी घेतल्यानंतरच अन्नवाटपाचे आयोजन करावे, असे आवाहन अन्न औषध प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# मतदार नोंदणीसाठी १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी विशेष शिबिरांचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत मतदार यादी अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत नागरिकांना नवीन मतदार म्हणून नोंदणी करणे, मतदार यादीतील विद्यमान नोंदींमध्ये दुरुस्ती करणे तसेच नाव वगळणीसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याकरीता नमुना ६, ७ व ८ पुरेशा प्रमाणात स्थानिक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या अनुषंगाने राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर दि. १९, २०, २६ आणि २७ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या दिवशी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत नियुक्त मतदान केंद्रांवर उपस्थित राहतील.


**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट - २ जागा
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा
ओ. टी. टेक्निशियन - २ जागा
डायलिसिस टेक्निशियन - २ जागा
वॉर्ड मॅनेजर - १ जागा
नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा
नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग
**कुटे हॉस्पिटल**
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

**पाहिजेत**
तरूणांसाठी सुवर्णसंधी
**राजवीर फार्मा**
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त होतकरू, तरूणांनी संपर्क साधावा
पुरूष - ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**आकर्षक पगारावर जागा भरणे आहे**
**सुपरवायझर**
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वतःची टु व्हिलर असणे अवश्यक)
**ऑफिस असिस्टंट**
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
**उमंग इन्फ्राटेक**
7875455777

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta

**पाहिजेत**
**रिषभ गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड**
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे (दोन्ही बाजूने रस्ता)
पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर
- संपर्क -
7385653323

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
**एजंट स्वागत**
- संपर्क -
9890468212

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846







# सध्याच्या काळात लोकांना हसवणे हे सर्वात मोठे पुण्य : मनीष मालपाणी

## समीर चौगुलेंच्या ‘सम्या-सम्या मैफिलीत माझ्या’ने संगमनेरकरांना मनमुराद हसविले




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - धावपळीच्या आणि तणावग्रस्त जीवनशैलीत लोकांना हसवणे हे मोठे पुण्याचे काम आहे. औषधाच्या डोसाइतकेच, किंबहुना त्यापेक्षाही अधिक गुणकारी हास्याचे डोस आहेत, असे प्रतिपादन संगमनेर फेस्टिवलचे प्रणेते व उद्योगपती मनीष मालपाणी यांनी केले.

राजस्थान युवक मंडळ, मालपाणी उद्योग समूह, संगमनेर नगरपरिषद, शहरातील गणेशोत्सव मंडळे आणि संगमनेरकर नागरिकांच्या सहभागातून आयोजित १८ व्या संगमनेर फेस्टिवलचे उद्घाटन नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांच्या हस्ते मालपाणी लॉन्स येथे झाले.

यावेळी गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष संजय मालपाणी, राजस्थान युवक मंडळाचे कार्याध्यक्ष सागर मणियार, उपाध्यक्ष कल्पेश मर्दा, सचिव कृष्णा असावा, खजिनदार वेणुगोपाल कलंत्री यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनीष मालपाणी म्हणाले की, संगमनेर फेस्टिवलच्या वाटचालीला १७ वर्षे पूर्ण झाली असून रसिक प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सांस्कृतिक प्रवास यशस्वी झाला आहे. नृत्य, संगीत, नाटक, कवी संमेलन आणि एकपात्री प्रयोग अशा विविध कलाविष्कारांमुळे फेस्टिवलने संगमनेरच्या सांस्कृतिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी फेस्टिवलच्या वाटचालीचे कौतुक करत राजस्थान युवक मंडळ आणि मालपाणी परिवाराच्या सांस्कृतिक बांधिलकीचे अभिनंदन केले. फेस्टिवलच्या सर्व उपक्रमांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

फेस्टिवलच्या पहिल्या दिवशी ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ फेम अभिनेते समीर चौगुले यांच्या ‘सम्या सम्या मैफिलीत माझ्या’ या एकपात्री प्रयोगाचे आयोजन करण्यात आले. दैनंदिन जीवनातील प्रसंग, नातेसंबंध आणि मानवी स्वभावातील गंमतीदार बारकावे आपल्या खास शैलीत सादर करत त्यांनी सुमारे दोन तास रसिकांना खळखळून हसविले. त्यांच्या अभिनयाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

उद्घाटन सोहळयात मालपाणी उद्योग समूहाच्या सुरक्षा विभागाने फेस्टिवलची ज्योत सवाद्य पथसंचलनातून व्यासपीठावर आणली. त्यानंतर डॉ. मैथिली तांबे आणि मनीष मालपाणी यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करण्यात आली. यावेळी आकर्षक इलेक्ट्रिक आतषबाजी करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर मणियार यांनी केले. सूत्रसंचालन रमेश घोलप यांनी केले, तर कृष्णा असावा यांनी आभार मानले. उद्घाटन सोहळ्यासह समीर चौगुले यांच्या कार्यक्रमाला संगमनेर शहर व परिसरातील रसिकांनी मोठी गर्दी केली. संगमनेरच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा हा फेस्टिवल यंदाही रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने रंगणार असल्याचे चित्र उद्घाटनावेळी पाहायला मिळाले.

---

# अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात अटल राष्ट्रीय प्राध्यापक विकास कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

### AI युगातील अद्ययावत ज्ञान व कौशल्यांनी प्राध्यापकांना सक्षम करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.” - प्राचार्य बावीस्कर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, संगमनेर येथील संगणक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या -ICTE-ATAL राष्ट्रीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाला विविध महाविद्यालये व संस्थांमधील ५० प्राध्यापक व संशोधकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. दि. ७ ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि लार्ज लँग्वेज मॉडेल्स: रचना, विकास आणि वास्तविक जीवनातील उपयोग या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्याकडून ३.५० लाखांचे अनुदान प्राप्त झाले आहे. या सहा दिवसीय कार्यक्रमामध्ये जनरेटिव्ह एआय ची मूलतत्त्वे, प्रभावी प्रॉम्प्ट इंजीनीअरिंग, लार्ज लँग्वेज मॉडेल्स, आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता साधने आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अनुप्रयोगांचा विकास, उद्योग व संशोधनातील एआयचा वापर तसेच वास्तविक जीवनातील एआय ॲप्लिकेशन यांसारख्या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिके आणि संवादात्मक सत्रे घेण्यात आली, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बावीस्कर यांनी दिली. कार्यक्रमासाठी विविध नामांकित शैक्षणिक संस्था व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सहभागी प्राध्यापकांना एआय आणि एलएलएम तंत्रज्ञानातील अद्ययावत ज्ञानासोबतच अध्यापन, संशोधन आणि उद्योगाभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली.

या कार्यक्रमाचे समन्वयक तथा संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. श्रीनिवास. के. सोनकर आणि सहसमन्वयक डॉ. अभिनव. एस. थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बावीस्कर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील या उपक्रमास विविध संस्थांमधून मिळालेला प्रतिसाद हा अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या एआय, तंत्रज्ञान आणि संशोधनाभिमुख उपक्रमांची राष्ट्रीय स्तरावरील वाढती ओळख दर्शविणारा ठरला. राष्ट्रीय स्तरावरील प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महसूल मंत्री मा. आमदार बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीरजी तांबे, सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. पी. आर. बावीस्कर, कुलसचिव प्रा. व्ही. पी. वाघे तसेच सर्व विभागप्रमुख यांनी आयोजन समितीचे अभिनंदन केले.

# जुन्या पेन्शनसाठी शिक्षकांचा २८ सप्टेंबरला मुंबईत एल्गार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अंशतः अनुदानित तत्त्वावर २००५ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी राज्यातील असंख्य शिक्षकांची आग्रही मागणी आहे. या मागणीसाठी येत्या २८ सप्टेंबर रोजी मुंबईत भव्य आंदोलन करण्यात येणार असून, या आंदोलनाच्या नियोजनासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकांची बैठक संगमनेर येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस आमदार सत्यजित तांबे उपस्थितें राहिले. त्यांनी शिक्षकांशी संवाद साधून त्यांच्या मागण्या, अडचणी आणि आंदोलनाच्या नियोजनाबाबत चर्चा केली. शिक्षकांच्या जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न हा त्यांच्या भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेशी संबंधित असल्याने शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली.

२००५ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांपैकी काही शिक्षकांना अंशतः अनुदानित तत्त्वावरील सेवेमुळे जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित राहावे लागत असल्याची भावना शिक्षकांमध्ये आहे. त्यामुळे समान सेवाकाळ आणि योगदानांच्या पार्श्वभूमीवर जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, यासाठी शिक्षकांकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. याच मागणीला व्यापक स्वरूप देण्यासाठी मुंबईतील आंदोलनाची तयारी सुरू आहे.

संगमनेर येथील बैठकीत जिल्ह्यातील शिक्षकांनी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. आंदोलन यशस्वी करण्यासाठी तालुकानिहाय नियोजन, शिक्षकांशी संपर्क आणि मुंबईतील उपस्थितीबाबत विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

आ. सत्यजित तांबे यांनी शिक्षकांच्या संघर्षाला ठाम पाठिंबा देत, शिक्षकांची जुनी पेन्शन योजनेची मागणी न्याय्य आहे. हा प्रश्न पूर्णपणे मार्गी लागेपर्यंत शिक्षकांसोबत खांद्याला खांदा लावून लढत राहू, असा विश्वास व्यक्त केला. शिक्षकांच्या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

दरम्यान, २८ सप्टेंबरच्या मुंबई आंदोलनासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शिक्षक सहभागी होणार असल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न शासनाने सकारात्मकतेने सोडवावा, अशी अपेक्षा शिक्षकांनी व्यक्त केली.

---

## दिनविशेष

२०१४: स्कॉटलंड — युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्याच्या विरोधात ५५% ते ४५% मते दिली.

२०११: सिक्कीम भूकंप — ईशान्य भारत, नेपाळ, भूतान, बांगलादेश आणि दक्षिण तिबेटमध्ये जाणवला.

२००२: हृषिकेश मुखर्जी — दिग्दर्शक, यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर.

१९९९: व्यंकटेश माडगूळकर — साहित्यिक, यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार जाहीर.

१९९७: टेड टर्नर — या अमेरिकन उद्योगपतींनी संयुक्त राष्ट्रांना १ अब्ज अमेरिकी डॉलर (तेव्हाचे ३१४० करोड रुपये) दान केले.

१९९७: कालिदास संस्कृत विद्यापीठ, महाराष्ट्र — स्थापना.

१९९०: संयुक्त राष्ट्र — लिकटेंस्टीनचा संयुक्त राष्ट्रात प्रवेश.

१९८४: जो किटिंगर — यांनी अटलांटिक महासागर पहिल्यांदाच एकट्याने बलून मधून पार

## जन्म

१९७१: लान्स आर्मस्ट्राँग — अमेरिकन सायक्लिस्ट

१९६८: उपेंद्र राव — भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि राजकारणी

१९५७: लॉईड मॉरिसन — एच. आर. एल. मॉरिसनचे संस्थापक (निधन: १० फेब्रुवारी २०१२ )

१९५६: अनंत गाडगीळ — भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे आमदार

१९५०: विष्णुवर्धन — भारतीय अभिनेते (निधन: ३० डिसेंबर २००९ )

१९४६: रवि नाईक — भारतीय राजकारणी, गोव्याचे माजी मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे सदस्य (निधन: १४ ऑक्टोबर २०२५ )

१९४५: जॉन मॅक्फि — मॅक्फिचे संस्थापक

१९२६: जो कुबर्ट — पोलिश-अमेरिकन चित्रकार, कुबर्ट स्कूलचे संस्थापक (निधन: १२ ऑगस्ट २०१२ )

१९१२: राजा नेने — भारतीय अभिनेते व दिग्दर्शक (निधन: २१ फेब्रुवारी १९७५ )

१९०६: काका हाथरसी — हिंदी हास्यकवी — पद्मश्री (निधन: १८ सप्टेंबर १९९५ )

## मृत्यू

२०२२: रश्मी जयगोपाल — भारतीय अभिनेत्री

२०२२: निशी सिंग — भारतीय अभिनेत्री

२०१३: वेलियाम भरगवन — भारतीय राजकारणी, केरळचे आमदार

२०१२: स्टीव्ह सबोल — अमेरिकन दिग्दर्शक आणि निर्माता, NFL फिल्म्सचे सहसंस्थापक (जन्म: २ ऑक्टोबर १९४२ )

२००४: डॉ. भालचंद्र दिनकर फडके — दलित साहित्याचे समीक्षक

२००२: शिवाजी गोविंदराव सावंत — मराठी कादंबरीकार, ‘मृत्युंजय’ आणि ‘छावा’ साठी प्रसिद्ध साहित्यिक — मूर्तिदेवी पुरस्कार, महाराष्ट्र भूषण (जन्म: ३१ ऑगस्ट १९४० )

१९९९: अरुण वासुदेव कर्नाटकी — मराठी चित्रपट दिग्दर्शक

१९९५: काका हाथरसी — हिंदी हास्यकवी — पद्मश्री (जन्म: १८ सप्टेंबर १९०६ )

१९९३: असित सेन — विनोदी अभिनेते व दिग्दर्शक

१९९२: मुहम्मद हिदायतुल्लाह — भारताचे ६वे उपराष्ट्रपती, आणि कार्यकारी राष्ट्रपती, ११वे सरन्यायाधीश (जन्म: १७ डिसेंबर १९०५ )

१७८३: लिओनार्ड ऑयलर — स्विस गणितज्ञ (जन्म: १५ एप्रिल १७०७ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१८ सप्टेंबर**

## संस्कृत शिक्षणाला नवी दिशा; कालिदास संस्कृत विद्यापीठाची स्थापना

महाराष्ट्रातील संस्कृत शिक्षण, संशोधन आणि भारतीय ज्ञानपरंपरेच्या संवर्धनासाठी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाची स्थापना १९९७ मध्ये करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने संस्कृत भाषेच्या विकासासाठी आणि संस्कृत विषयातील उच्च शिक्षणाला स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या विद्यापीठाची निर्मिती केली. विद्यापीठाचे मुख्यालय रामटेक, नागपूर जिल्हा येथे आहे.संस्कृत ही भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेची महत्त्वाची भाषा मानली जाते. वेद, उपनिषदे, पुराणे, रामायण, महाभारत, आयुर्वेद, योग, ज्योतिष, व्याकरण, दर्शन आणि विविध शास्त्रांचे विपुल साहित्य संस्कृतमध्ये उपलब्ध आहे. या समृद्ध परंपरेचे शास्त्रशुद्ध अध्ययन आणि आधुनिक काळाशी त्याची सांगड घालण्याचे काम विद्यापीठाच्या माध्यमातून केले जाते.विद्यापीठाला भारतातील महान संस्कृत कवी आणि नाटककार कालिदास यांचे नाव देण्यात आले आहे. कालिदासांच्या साहित्यिक योगदानाची आठवण आणि संस्कृत साहित्याची परंपरा पुढे नेण्याचा संदेश या नावातून मिळतो. संस्कृत विषयातील पदवी, पदव्युत्तर आणि संशोधनाच्या विविध संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे हे विद्यापीठाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.विद्यापीठामध्ये संस्कृत व्याकरण, साहित्य, वेद, वेदांग, भारतीय दर्शन, धर्मशास्त्र, ज्योतिष, योग, आयुर्वेद आणि भारतीय संस्कृतीशी संबंधित विविध विषयांचा अभ्यास केला जातो. पारंपरिक गुरुकुल पद्धतीतील ज्ञान आणि आधुनिक विद्यापीठीय शिक्षणपद्धती यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न येथे केला जातो. त्यामुळे संस्कृतचे पारंपरिक विद्यार्थी तसेच आधुनिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही विविध अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत.संस्कृत भाषेच्या अध्यापनाबरोबरच संशोधनाला विद्यापीठाने महत्त्व दिले आहे. प्राचीन ग्रंथांचे अध्ययन, त्यांचे संपादन, भाषांतर, भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि संस्कृत साहित्याचे आधुनिक संदर्भात विश्लेषण यांसारख्या क्षेत्रांत संशोधनाला प्रोत्साहन दिले जाते. भारतीय ज्ञानपरंपरेतील विविध विषयांचा आधुनिक विज्ञान, शिक्षण आणि समाजजीवनाशी संबंध शोधण्याचे कार्यही महत्त्वाचे ठरते.विद्यापीठाच्या माध्यमातून संस्कृत भाषा केवळ धार्मिक किंवा पारंपरिक विषयापुरती मर्यादित न ठेवता तिच्याकडे ज्ञान, साहित्य, संशोधन आणि रोजगाराच्या दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विविध परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि संशोधन उपक्रमांमधून संस्कृतविषयी जनजागृती केली जाते.स्थापनेपासून विद्यापीठाने महाराष्ट्रातील संस्कृत शिक्षणाला संस्थात्मक बळ दिले. संस्कृत शिक्षक, संशोधक, अभ्यासक आणि विद्यार्थ्यांसाठी हे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात संस्कृतचे स्थान अधोरेखित करण्याबरोबरच प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही विद्यापीठ पार पाडत आहे.१९९७ मध्ये झालेली कालिदास संस्कृत विद्यापीठाची स्थापना ही महाराष्ट्रातील संस्कृत शिक्षणाच्या इतिहासातील महत्त्वाची घटना ठरली. आधुनिक काळात संस्कृत भाषेचा अभ्यास आणि संशोधन अधिक व्यापक करण्यासाठी या विद्यापीठाचे योगदान उल्लेखनीय आहे.

## डॉ. भालचंद्र फडके - दलित साहित्याचे मर्मग्राही समीक्षक

**जन्मदिन विशेष**

मराठी साहित्यविश्वात दलित साहित्याच्या स्वतंत्र प्रवाहाची चिकित्सक आणि अभ्यासपूर्ण मांडणी करणारे डॉ. भालचंद्र दिनकर फडके हे महत्त्वाचे समीक्षक, लेखक आणि विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म १३ मे १९२५ रोजी झाल्याचा उल्लेख अनेक दिनविशेष स्रोतांमध्ये आढळतो, तर त्यांचे निधन १८ सप्टेंबर २००४ रोजी झाले.डॉ. फडके हे मराठीचे प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते. एम.ए., बी.टी. आणि पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले. अध्यापनाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि वाङ्मयीन विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले. अनेक शासकीय समित्यांवर अध्यक्ष व सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले.दलित साहित्य हा त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील विशेष अभ्यासाचा विषय होता. मराठी साहित्यात दलित लेखनाचा प्रभाव वाढत असताना या साहित्यामागील सामाजिक वास्तव, वेदना, संघर्ष आणि विद्रोह समजून घेण्याचे महत्त्वाचे काम फडके यांनी केले. ‘दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह’ हा त्यांचा विशेष गाजलेला ग्रंथ आहे. दलित साहित्यावरील मराठी भाषेतील सुरुवातीच्या महत्त्वाच्या व्यापक समीक्षाग्रंथांपैकी हा ग्रंथ मानला जातो.दलित साहित्याकडे केवळ साहित्यप्रकार म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्याची भूमिका फडके यांच्या लेखनात दिसते. जातिव्यवस्था, अस्पृश्यता, सामाजिक विषमता, शोषण आणि त्याविरोधातील संघर्ष या विषयांचा त्यांनी चिकित्सक पद्धतीने विचार केला. दलित लेखकांच्या अनुभवविश्वाला साहित्यिक मूल्यांच्या चौकटीत समजून घेण्याचा प्रयत्न त्यांच्या समीक्षेत आढळतो. त्यामुळे दलित साहित्याच्या अभ्यासाला वैचारिक आणि ऐतिहासिक संदर्भ मिळाला.त्यांच्या लेखनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना विशेष महत्त्व होते. ‘डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य’, ‘डॉ. आंबेडकरांचे सामाजिक




दृष्टिकोन’, तसेच ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र’ यांसारख्या लेखनातून त्यांनी आंबेडकरी विचार आणि सामाजिक परिवर्तन यांचा अभ्यास केला.त्यांनी केवळ दलित साहित्यावरच लेखन केले नाही. ‘कथाकार खानोलकर’, ‘मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन’, ‘दलित रंगभूमी’, ‘दलित साहित्याची प्रकाशयात्रा’ यांसारख्या ग्रंथांमधून त्यांची व्यापक साहित्यदृष्टी स्पष्ट होते.डॉ. फडके स्वतः दलितेतर समीक्षक असूनही त्यांनी दलित साहित्य आणि दलित चळवळीचा गांभीर्याने अभ्यास केला. त्यामुळे त्यांच्या समीक्षेने दलित साहित्याकडे मुख्य प्रवाहातील मराठी वाचक आणि अभ्यासकांचे लक्ष वेधले. दलित साहित्याच्या वेगळेपणाचा शोध घेताना त्यांनी त्याची ऐतिहासिक आणि सामाजिक मांडणी केली.१८ सप्टेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले; मात्र दलित साहित्याच्या अभ्यासासाठी त्यांनी केलेले कार्य आजही महत्त्वाचे मानले जाते. मराठीतील दलित साहित्याच्या चिकित्सक अभ्यासाची पायाभरणी करणाऱ्या समीक्षकांमध्ये डॉ. भालचंद्र फडके यांचे स्थान निश्चितच उल्लेखनीय आहे. त्यांच्या लेखनामुळे दलित साहित्याकडे केवळ वेदनेचे साहित्य म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तन, आत्मभान आणि विद्रोहाची अभिव्यक्ती म्हणून पाहण्याची दृष्टी विकसित झाली.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com



आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# दैनिक युवावार्ता कार्यालयात मान्यवरांकडून गणेशाची आरती




संगमनेर - दैनिक युवावार्ता कार्यालयामध्ये विराजमान असलेल्या गणरायाची आरतीसाठी अकोले नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सोनालीताई नाईकवाडी, अमृतवाहिनी शेती व शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक अनिल शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी युवावार्ता परिवाराशी अनौपचारीक संवाद साधताना सौ. सोनालीताई नाईकवाडी व अनिल शिंदे यांनी आपआपल्या क्षेत्रातील अनुभव व भविष्यातील सामाजिक, शैक्षणिक कार्याची दिशा विषद केली. याप्रसंगी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे व संपादक सौ. सुशीला किसन हासे यांनी मान्यवरांचा सत्कार केला. यावेळी नामदेव गायकवाड, श्री. कहाणे, आनंद हासे, सुदीप हासे यांच्यासह युवावार्ता परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# आमदार सत्यजीत तांबे यांच्या संकल्पनेतून 'महावादन'चा जल्लोष, संगमनेर दुमदुमले !

## परंपरा, संस्कृतीचा समृद्ध ठेवा जपणारा सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आपली संस्कृती, आपला अभिमान' या विचाराला कृतीची जोड देत आमदार सत्यजीत तांबे यांच्या संकल्पनेतून संगमनेरमध्ये आयोजित करण्यात आलेला 'महावादन सोहळा' वर्ष दुसरे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. ढोल-ताशांच्या निनादाने संगमनेरचा परिसर दुमदुमून गेला, तर हजारो संगमनेरकरांनी उपस्थित राहत या सांस्कृतिक सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सोहळ्यात तांडव, हिंदूराजा, रुद्र प्रतिष्ठान, छावा आणि एकलव्य गर्जना या पाच ढोल-ताशा पथकांनी दमदार वादनाचे प्रात्यक्षिक सादर केले. पारंपरिक वादनातील कौशल्य, शिस्त आणि कलात्मकतेची अनुभूती उपस्थितांना मिळाली. पथकांच्या जोशपूर्ण सादरीकरणाने संपूर्ण वातावरणात उत्साह आणि चैतन्य निर्माण झाले.

परंपरेचा आणि संस्कृतीचा समृद्ध ठेवा जपतानाच नव्या पिढीला आपल्या मातीशी जोडणारे व्यासपीठ म्हणून 'महावादन सोहळ्या'ची ओळख निर्माण होत आहे. आपल्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन व्हावे, तसेच या क्षेत्रातील कलावंतांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला संगमनेरकरांनी भरभरून दाद दिली. ढोल-ताशांच्या गजरात तरुणाईसह सर्व वयोगटातील नागरिकांनी या सोहळ्याचा आनंद घेतला. आपल्या परंपरा आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी अधोरेखित करणारा हा सोहळा ठरला.

आमदार सत्यजीत तांबे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या महावादन सोहळ्याच्या दुसऱ्या वर्षालाही संगमनेरकरांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा या उपक्रमाशी निर्माण झालेल्या आपुलकीची प्रचिती देणारा ठरला. परंपरा जपत आधुनिक पिढीला संस्कृतीशी जोडणारे असे उपक्रम सातत्याने व्हावेत, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# ध्वनी प्रदूषणाच्या विळख्यात रुग्णालये

## सिकची, खताळ क्लिनिकचा बाधित क्षेत्रात समावेश करा - प्रांताधिकाऱ्यांकडे निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कॅप्टन लक्ष्मी चौक ते शनिमंदिर परिसरात सातत्याने होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाचा रुग्णालये व रुग्णांनाही मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने सिकची बालरुग्णालय व खताळ पाटील क्लिनिकचा ध्वनी प्रदूषणबाधित क्षेत्राच्या यादीत समावेश करावा अशी मागणी डॉ. ओमप्रकाश सिकची व डॉ. राजेंद्र भि. खताळ यांनी केली आहे.

याबाबत प्रांताधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कॅप्टन लक्ष्मी चौक ते शनिमंदिर परिसरात लग्न सभागृहे तसेच विविध धार्मिक स्थळे आहेत. या परिसरात विविध कार्यक्रम, उत्सव व धार्मिक सोहळ्यांच्या वेळी मोठ्या आवाजात डीजे व लाऊडस्पीकरचा वापर केला जातो. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण निर्माण होत असून त्याचा नागरिकांसह रुग्णांनाही त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषत: सिकची बालरुग्णालय आणि खताळ पाटील क्लिनिकमध्ये लहान मुलांवर उपचार केले जात असल्याने परिसरातील कर्णकर्कश आवाजाचा रुग्णांच्या शांतता व उपचार प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. असे असतानाही ध्वनी प्रदूषणामुळे बाधित क्षेत्रांच्या यादीत या परिसराचा समावेश करण्यात आलेला नसल्याबद्दल निवेदनाद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे.

त्यामुळे डॉ. ओमप्रकाश सिकची यांच्या सिकची बालरुग्णालयाचा तसेच डॉ. राजेंद्र भि. खताळ यांच्या खताळ पाटील क्लिनिकचा परिसर ध्वनी प्रदूषणबाधित क्षेत्र म्हणून घोषित करून यादीत समाविष्ट करावा. तसेच परिसरातील अनावश्यक व कर्णकर्कश ध्वनीवर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तत्काळ योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती संगमनेर उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी आणि संगमनेर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनाही देण्यात आल्या आहेत.


नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165


# गैरहजर अधिकाऱ्यांना 'शो-कॉज' नोटिसा काढा- टंचाई बैठकीत आ. खताळ आक्रमक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -टंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीला काही अधिकारी व कर्मचारी गैरहजर राहिल्याने आमदार अमोल खताळ पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. गैरहजर अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ 'शो-कॉज' नोटिसा बजावण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिले.

यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन येथे झालेल्या या बैठकीस उपविभागीय अधिकारी प्रवीण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, महावितरणचे कार्यकारी अभियंता नारायण सोनवणे, कृषी विभागाचे अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान काही अधिकारी व कर्मचारी अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आल्यानंतर आमदार खताळ यांनी नाराजी व्यक्त केली. टंचाई आढावा बैठक हा गंमत करण्याचा विषय वाटला का? असा सवाल करत टंचाईच्या काळात सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

टंचाईग्रस्त गाव, वाड्या-वस्त्यांना आवश्यकतेनुसार तातडीने टँकर सुरू करण्याच्या सूचना आमदार खताळ यांनी प्रशासनाला दिल्या. ग्रामसेवक गावात उपलब्ध नसल्याने नागरिकांना पाणीपुरवठ्याच्या प्रश्नांसाठी लोकप्रतिनिधींकडे यावे लागू नये, यासाठी ग्रामपातळीवरील यंत्रणा अधिक सक्रिय करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीत पीकविमा, वीजपुरवठा, जलजीवन मिशनची कामे, पाणीपुरवठा आणि ग्रामीण भागातील टंचाई उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. नागरिक व शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय घ्यावेत आणि सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे, असे निर्देश आमदार खताळ यांनी दिले.


दर्शन टेक्स्टाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25